**<u>निशाणी क्र. ०८</u>**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांची जबानी
देवाची शपथ खरे सांगतो की,

माझे नांव – प्रशांत भुजंगराव निंबाळकर,
माझे वय – ४६ वर्षे, धंदा – चालक,
राहणार – नांदुरा, ता. नांदुरा, जि. बुलडाणा.

– – – – –

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी वकील श्री.बी.व्ही.वाहूरवाघ यांच्यामार्फत</u>**

माझे कडे एमएच २८ आर ३३८० ही गाडी असुन ती गाडी नांदुरा ते खामगांव अशी वाहतुक करतो. माझ्या गाडीचा थांबा गणी पेट्रोल पंप येथे आहे. मी आरोपीला ओळखतो त्याच्याकडे गाडी असुन तिचा क्रमांक एमएच २८ आर ३०७३ आहे. घटना दिनांक २४/०७/२०२१ रोजी गणी पेट्रोल पंपाजवळ घडली होती. मी माझ्या गाडीमध्ये नंबर प्रमाणे प्रवासी भरत होतो. त्यावेळी आरोपी माझ्या गाडी समोर त्याची गाडी घेवुन आला आणी त्याचा नंबर नसतांना प्रवासी भरु लागला. त्यावेळी मी आरोपीला थांबविले व त्याला सांगितले की, तु प्रवासी भरु नको. मी त्याच्या हाताला धरुन प्रवासी न भरण्यासाठी सांगत असतांना त्यावेळी आरोपीने गाडीतुन काहीतरी वस्तु काढुन माझ्या डोळ्यावर मारली. त्यामुळे माझ्या डोळ्याजवळ जखम झाली होती.

२. घटना चालु असतांना त्याठिकाणी इरफान, पिंटु जगदाळे व इमरान तेथे आले व त्यांनी आमचे भांडण सोडविले. घटनेबाबत मी आरोपीविरुध्द फिर्याद दिली होती. मला आता फिर्याद दाखविण्यात आली, त्यातील मजकूर खरा आहे, त्यावर माझी सही आहे, त्यास **<u>निशाणी क्र. ०९</u>** देण्यात येते. छापील खबर **<u>निशाणी क्र. १०</u>** वर आहे. पोलीसांनी मला सरकारी दवाखान्यात नांदुरा येथुन खामगांव व अकोला येथे उपचारासाठी पाठविले. घटनास्थळावर चौकशीसाठी

पोलीस आले होते. त्यांनी त्या ठिकाणाहुन एक दगड हस्तगत केला होता. तो दगड दाखविल्यास मी तो ओळखु शकतो. पोलीसांनी माझा जबाब नोंदविला होता.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. जी.ई. निमकर्डे यांच्यामार्फत.</u>**

३. आरोपी हा पिंटु जगदाळे यांच्या दुकानासमोर प्रवासी त्याच्या गाडीत बसवित होता. हे म्हणणे खरे आहे की, पिंटु जगदाळेचे दुकान गणी पेट्रोल पंपाच्या थोड्या अंतरावर खामगांवकडे जाणा–या रस्त्यावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा रेल्वे स्टेशनकडुन त्याची गाडी घेवुन आला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या गाडीमध्ये इतर पाच ते सहा प्रवासी होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा माझ्या गाडीकडे येणारे प्रवासी त्याच्या गाडीमध्ये बसवित होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आरोपीच्या गाडीचा दरवाजा उघडुन त्याला थांबविले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला हात धरुन त्यास अडवुन, हटकले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या डोळ्याला कुठली वस्तु लागली हे मला माहित नाही. हे मला माहित नाही की, आरोपीने माझ्या डोळ्यावर मारलेली वस्तु गाडीतील होती किंवा नाही. आरोपीने मला कुठल्या वस्तुने मारले हे मला माहित नाही, असे मी पोलीसांना माझ्या जबाबात सांगितले होते. सदरील बाब माझ्या जबाबात का नमुद नाही, त्याचे कारण मी सांगु शकत नाही.

४. सैय्यद इरफान व पिंटु जगदाळे यांना मी ओळखतो ते नांदुरा येथिल रहिवाशी असुन त्यांच्याशी चांगले संबंध आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद देतांना माझ्या सोबत कोणीही नव्हते. मी माझ्या फिर्यादीत व जबाबात मी फिर्याद देतांना माझ्या सोबत माझा मित्र सैय्यद इरफान सैय्यद इकबाल हजर होता असे सांगितले होते. तसे माझ्या फिर्यादीत व जबाबात का नमुद आहे, याचे कारण मी सांगु शकत नाही.

५. घटना ही पाच मिनीटे चालु होती. हे म्हणणे खरे आहे की, मला

मारल्यामुळे जखम झाली होती व रक्त माझ्या शर्टवर पडलेले होते, ते रक्त मी रुमालाने पुसले होते. मी पोलीसांना रक्ताने माखलेले शर्ट व रुमाल दाखविले होते. ते पोलीसांनी तपासकामी ताब्यात घेतले नव्हते. मी फिर्याद देतांना पोलीस ठाण्यात एक तास हजर होतो. पोलीसांनी माझा जबाब घटनेनंतर सात ते आठ दिवसांनी घेतला होता. घटनास्थळ पंचनामा कधी झाला याबाबत मला माहित नाही.

६. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे गणी पेट्रोल पंपाच्या समोरील राष्ट्रील महामार्ग वर आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर जळगांव, खामगांव, मलकापुर आणि नांदुरा येथिल बाजर पेठेतील रस्ता येवुन मिळतो. पेट्रोल पंपाच्या पश्चिमेस अनेक दुकाने, दवाखाना, मेडिकल आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदरील दुकाने, दवाखाना व मेडिकल च्या पाठीमागिल मोकळ्याजागेत काळी–पिवळी थांबतात. हे म्हणणे खरे नाही की, पेट्रोल पंपाच्या समोर कुठल्याही काळी–पिवळी प्रवासी गाड्यांचा थांबा नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर चार बाजुनी गाड्या येत असल्याकारणाने तेथे कुठलीही प्रवासी गाडी प्रवासी भरण्यासाठी थांबत नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर नेहमी पोलीस असतात.

७. हे म्हणणे खरे आहे की, काळी–पिवळी गाडी थांबावर लावण्यासाठी एक एजेंट असतो व तो गाडीचा नंबर नमुद करतो व तो गाडी नंबरला लावतो आणि गाडीत प्रवासी भरतो. घटनेच्या दिवशी सुभान खान हा एजेंट घटनास्थळावर होता. घटनास्थळावर दोन ते चार लोक हजर होते. तपासा दरम्यान मी गाडीचे कागदपत्र पोलीसांना दिले नव्हते.

८. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी सकाळी माझ्या डोळ्याला जखम झाली होती. मी सांगितलयाप्रमाणे डॉक्टरने माझी वैद्यकिय तपासणी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेच्या अगोदर जखम झाली होती, त्याचा

गैरफायदा घेवुन आरोपीविरुध्द खोटी केस केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला मारहाण किंवा शिवीगाळ केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने नांदुरा येथे त्याच्या गाडीमध्ये प्रवासी भरु नये म्हणुन त्याच्याविरुध्द खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/–

नांदुरा.
दिनांक – ०८/११/२०२२.

**(आर.ए. मिसाळ)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
नांदुरा.

– – – – –